# १९

# सांबराचे लोटण

सांबरीच्या नराला ढाक म्हणतात. सांबराचा तसा प्रकार एकच. नर मात्र कुसऱ्या ढाक, जिऱ्या ढाक व खेकस ढाक अशा तीन प्रकारांनी ओळखला जातो. ढाक दहाव्या वर्षी वयात येतो. वय व रंगानुसार ढाकाचे विविध प्रकार जंगलातील आदिवासी व अनुभवी शिकारी मानतात. पानगळीची जंगलं त्याल आवडतात. जंगलांत ' ढांक ' असा त्याचा पुन:पुन्हा आवाज येऊ लागला की निश्चित समजावे की जवळपास वाघ फिरतोय. त्याच्या ' ढांक ' ह्या आवाजावरून त्याचे ढाक हे नाव पडले असावे !

अरण्यात ढाक बारासिंगी व रानगवा ठरावीक ठिकाणी लोळण घेण्यासाठी पाण्याची स्थळं निवडतात. अशा जागेस लोटण म्हणतात. पावसाळा संपून हिवाळा सुरू झाला की झीलानी, पाण्याची झरण, दलदली, ओढ्याकाठचा गाळ व पाणझरी ह्या स्थळांच्याजवळ माती व चिखलात ढाक लोळण घेतो. या दिवसात त्याचं अंग चिखलानं माखलेलं दिसतं. जुनी सांबरशिंगं गळून नवीन शिंगावरील मखमली आवरण हळूहळू निघून जात असतं. शरीरात चरबीचा थर धरू लागतो. लोळताना तो अंग घुसळतो. पायाचे खूर घासतो. शिंगांनी माती उकरतो. त्यामुळे त्याच्या शरीराच्या आकारापेक्षा मोठी लोटण तयार होते.

अशा रीतीने एकदा तयार झालेले लोटण जंगलात कायम असते. हे लोटण पहिल्यांदा कुठला ढाक बनवितो, जागा कशी निवडतो, लोटण एखाद्या ढाकाच्या मालकी हक्काचे असते काय ? किंवा ते लोटण कुठलाही ढाक उपयोगात आणू

शकतो की परंपरेने एका सांबरकळपाकडून ते दुसऱ्या कळपाकडे जाते ? पाणी उपलब्ध असेल तेथे ढाक वर्षभर लोटण उपयोगात आणताना आढळून येतो. तो का लोळतो ? हिवाळ्यात अशा लोटणात ऊब असते. चरबीने माद आल्यामुळे निर्माण होणाऱ्या शरीरातल्या उष्णतेचा शम होण्यासाठी लोळत असावा. परंतु लोटणाचे रहस्य वन्य जीवशास्त्रज्ञांना अद्यापपर्यंत पूर्णतः उलगडता आले नाही.

श्रीमती दुर्गा भागवतांचा ' भावमुद्रा ' हा ललित संग्रह सुप्रसिद्ध आहे. त्यातील ' गूढ गुंजन ' या लेखात एक लोकगीत असून त्यात ' पाटन ' म्हणजे सांबराच्या लोटणाचा मार्मिक उल्लेख आहे.

" मलेवा पहाडतोने उतरथ है पानी
कैनेको ठमकत रेंगवें उतरे बानी
मलेवा तो पहाडमें गजब सांभरके पाटन
और तैं हावस रैमालिन गजबके चाटन. "

मालेवा पहाडातून पाणी उतरत आहे. ही कोण बरे ठुमकत ठुमकत येत आहे ! हिचा चेहरा असा का बरे उतरला आहे ? मालेवा डोंगरात ठिकठिकाणी जिथे सांबरे बसतात असे लोटण आहेत. रैमालिन तिथे चाटण म्हणजे खाऱ्या मातीच्या जागा आहेत.

चाटण म्हणजे ' सॉल्ट लिक '. जंगलात ठिकठिकाणी जसे लोटण असतात तसेच चाटणही असतात. जंगलातल्या चाटणाचे अस्तित्व वन्य प्राण्यांना उपजत असते. गीतात वनाच्या समृद्धीचे वर्णन आहे. तसेच आदिवासींच्या भावजीवनात जंगलातील वन्य प्राणी आणि तेथील स्थळांबद्दलची आनुवंशिक ओढ प्रतीत होते.

नवेगाव-बांधाजवळ गांधारीच्या जंगलात एक अद्भुतरम्य झीलान आहे. तिथे जमिनीखालच्या भागातून पाणी पाझरते. त्यामुळे त्या ठिकाणी वर्षभर हिरवळ असते. दुर्मिळ अशा गरुडाचा शोध करीत मी ह्या झीलानीभोवती भटकत असता मला थोड्या अंतरावर चाहूल लागली. पाहतो तो हिरव्या गवतात लाल रंगाचा ढाक. लोटणाच्या चिखलात तो पाठीवर पडला होता. तो उजव्या शिंगाच्या टोकांनी माती खणत होता. डोक्याला झटके देत होता. मी लगेच जवळच्या झाडाआड झालो आणि पुढे निरीक्षण करू लागलो. तो काही मिनिटांतच जागेवरून

उठला. साठसत्तर फूट चालून जंगलात गेला. जवळच गरारीचे झाड होते. त्यावर त्याने शिंगाने धडक दिली. थोडा वेळ शिंगे साफ केली. पुढचे पाय उंच करून झाडावर टेकले खूर घासले. परत हिरवळीत आला. गवताला तोंड लावून कुरतडल्यासारखे केले अन् अरण्यात दिसेनासा झाला.

मी त्या झाडाजवळ गेलो. भोवताली बारकाईनं निरीक्षण केलं. ते शिंगे घासण्याचे झाड होते. अशा झाडाला घासण म्हणजे प्रिचिंग म्हणतात. झाडावर व झाडाभोवताली पाय आपटल्यामुळे जागा मळून गेली होती. अशी जागा ढवसण म्हणजे 'स्टँपिंग ग्राऊंड' म्हणून ओळखली जाते. अशा झाडाभोवती ढाक सांबरीमागे गोल गोल फिरत तिचा अनुनय करतो. कित्येकदा सांबरी व तिची पिले ह्या रिंगणाभोवती खेळताना दिसतात. लोटण, घासण व टवसण ही स्थळे एकमेकांना पूरक असावीत.

सांबराला अतिथंडीची बाधा होत नाही. तसेच अतिउष्णता सहन करण्याची त्याची कुवत आश्चर्यजनक आहे. उन्हाळ्यात जंगलातून वणवा लागतो. उभी झाडे पेट घेतात. जळता जळता कलथून पडतात. अनेक दिवस जळून त्या ठिकाणी पांढरी राख पडते. त्या राखेवर सांबरी व तिची पिले उन्हाच्या कारात स्वस्थपणे बसलेली आढळतात. या ठिकाणी जमिनीच्या खालच्या थरापर्यंत उष्णता असते.

ढाक जंगलात विशिष्ट ठिकाणी लोटण, घासण, टवसण व विश्रांतिस्थाने का निवडतात ? अशा जागा निवडताना निवारा, ऊब व भक्षक शत्रूंपासून संरक्षणाचा विचार असणार. सांबर वाघाचे मुख्य भक्ष्य असले तरी ढाकाला मारण्यात त्याला यश येत नाही. सांबरी व तिच्या पिलांवरच त्याला भागवावे लागते. लोटणावरच्या शक्तिमान ढाकाला मारणे हे वाघाला आव्हान असते. पण वाघ त्याच्या वाटेला जात नाही. अशा क्षेत्रात वाघ सांबरी व तिच्या पिलांनाही इजा करीत नाही. अशी स्थाने दकगॅल शास्त्राच्या क्षेत्रात येत असावीत. त्यातील ऊर्जेचे आकर्षण ह्या प्राण्यांना वाटत असावे.

पण लोटण ढाकाच्या संरक्षणाची जागा असते. याचे प्रत्यंतर माधवराव पाटलांना एकदा आले होते. तो अनुभव सांगताना ते म्हणाले, " चुटियाच्या जंगलात पांढरी झरी आहे. झरीला लागून सांबराचे लोटण आहे. हे लोटण भुत्याचे लोटण म्हणून ओळखले जाते. तेथे शिकारीला कुणी जात नसे.

गेल्यावर तेथे काहीतरी चमत्कार घडत. सांबराला गोळी घातली की ते सांबर खाली पडते. जागेवर जाऊन पाहिलं तर काहीच दिसत नाही. कित्येकदा झाड पेटल्यासारखं दिसतं. वाघानं आवाज काढावा तसा मोठा आवाज होतो. झरीवर भूतदिवे दिसतात."

परंतु मी तिथं बेधडक सांबर मारीत असे. कोणी साथीदार मिळायचा नाही. एकटाच जात असे. एका रात्री भोवतालचं घनदाट जंगल जाणवू लागलं. हजार फांद्यांनी ( आवाजांनी ) बोलू लागलं. अगदी अंधार मिळूनतही मला जंगलाची ओळख पटली आणि जंगलालाही माझं नातं उमगलं होतं. अगदी दुरून सारी रात्रभर हाक येत होती. तू येथे ये ! येथे ये ! जंगलातून येत असलेला हा आवाज पखमांजराचा नव्हता, झरीवाऱ्याचा नव्हता किंवा झाडाच्या टोकावरून शांतपणे घिरट्या घालणाऱ्या हुमा घुबडाचा नव्हता. कारण ही जंगलातली हाक त्यांनाही ऐकू आल्याप्रमाणं झाडंदेखील लक्ष देऊन ऐकत होती.

'या रानभुलीनं मी सहा वर्षे अंथरुणावर खिळून होतो. वाड्यात माझ्या खोलीतल्या ऊबदार अंथरुणावर पडलो असता रान अशा तऱ्हेनं मला सतत सहा वर्षे साद घालीत राहिलं.'

'या प्रसंगानंतर मी पुन्हा कधीही लोटणातल्या सांबरावर बंदूक धरली नाही.'

